# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 22/12/2022 (गुरूवार) सायंकाळ

---

## चोरीच्या गुन्हयातील आरोपी गजाआड

### —: स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामीण ची कारवाई :—

पो.स्टे. कुही :— नागपूर ग्रामीण हद्दीत दिनांक २२/१०/२०२२ रोजी फिर्यादी नामे— श्री तुषारकुमार रेवनलाल पारधी, वय ३४ वर्ष, रा. प्लॉट नं. २६, बहादुरा ग्रामपंचायचे मागे, पांदन रोड, श्रीनगर, बहादुरा, नागपुर यांनी पोलीस स्टेशन कुही येथे तोंडी रिपोर्ट दिला की, मौजा कळमना व्यंकटेश सिटी गेटच्या समोर ठेवलेले विज वाहणीचे ११ मीटरचे ७ लोखंडी पोल किंमती अंदाजे ८८०००/— रू., १० मिटरचे ०१ लोखंडी पोल किंमती अंदाजे १२७०० रू., ९ मिटरचा ०१ लोखंडी पोल किं. ६१००/— रू. असा एकुण १,०६,८००/— रूपयाचा मुद्देमाल काही अज्ञात चोरटयाने चोरी केल्याबाबत आर. डी. ईलेक्ट्रीकल्स यांच्याकडुन पेटी कॉन्ट्रॅक्टर म्हणुन काम घेतलेले फिर्यादीच्या अशा तक्रारीवरून पो.स्टे कुही अप. क्र. ४७४/२०२२ कलम ३७९ भादवि. वरून सदरचा गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर गुन्हयाचे समांतर तपास करीत असता मुखबिरव्दारे गोपनिय माहिती मिळाली की, गुन्हयात चोरीचा मुद्देमाल वाहून नेण्यासाठी वापर करण्यात आलेला आयसर ट्रक क्र. MH40 BL 2213 हा असुन तो दिघोरी येथे कैलाश शाहू यांचा आहे. सदर आयसर ट्रक यास ताब्यात घेवून मालकाची सखोल विचारपूस केली असता त्याने सांगितले की, सदर लोखंडी पोल हे आरोपी नामे—१) महेश अवदेश शाहू, वय २७ वर्ष, रा. दिघोरी नागपूर व २) मो. अफरोज मो. हनीफ, वय ३२ वर्ष, रा. बडाताजबाग जवळ नागपूर यांनी चोरी केल्याचे सांगितले. यातील दोन्ही आरोपीस ताब्यात घेऊन त्यांचेकडुन गुन्हयात चोरी केलेले १) लोखंडी पोल कटिंग केलेले ३२ नग किंमती अंदाजे ४८,०००/—रू. २) आयसर ट्रक क्र. MH40 BL 2213 किंमती अंदाजे ११,००,०००/—रू. असा एकुण ११,४८,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून आरोपी व मुद्देमालासह पोलीस स्टेशन कुही यांना पुढील कारवाई साठी ताब्यात देण्यात आले.

सदरची कार्यवाही ही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, सहायक पोलीस निरीक्षक जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक भारत थिटे, पोलीस हवालदार मदन असतकर, नरेंद्र पटले, अरविंद भगत, पोलीस नाईक अजीज दुधकानोज, बालाजी साखरे, चालक आशुतोष लांजेवार तसेच सायबर सेलचे सहायक पोलीस निरीक्षक ठाकुर, पोलीस नायक सतिश राठोड यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.




## घरफोडी

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत १३ कि.मी. अंतरावरील जुनोनी शिवार येथे दिनांक २१/१२/२०२२ चे १९.०० वा. ते २२/१२/२०२२ चे ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— दिपक आनंदराव माटे वय ३७ रा. प्लाट न ५९ गुमडे ले आउट गजानन मंदीर जवळ उमरेड यांचे वडीलोपार्जीत १३ एकर शेती जुनोनी येथे असुन शेतात कापुस लावले असता कापसाची वेचनी करून २५ ते ३० क्विंटल कापुस शेतामध्ये असलेल्या मकानात ठेवलेला होता. नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचा भाऊ नामे— सुनिल व त्याची पत्नी ही शेतात असलेल्या मकानात गेले असता त्याला मकानाचे समोरील दरवाज्याचे कुलुप तुटलेले दिसले आत जावुन पाहीले असता मकानामध्ये ठेवलेला २५ ते ३० क्विंटल कापसापैकी अंदाजे ७ क्विंटल कापुस प्रति क्विंटल किंमती ६०००/— रू. प्रमाणे असा एकुण किंमती अंदाजे ४२०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. उमरेड येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार ब. नं. ७५७ भोजराज झाडे मो. नं. ८९९९४३४२७२ करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**